MHTH070039432023

दाखल दिनांक २०.०९.२०२३
नोंदणी दिनांक २९.०९.२०२३
निकाल दिनांक ०६.०८.२०२६
कालावधी ०२ वर्ष १० महिने १७ दिवस

सहदिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालय, कल्याण, जि. ठाणे
(पीठासीन अधिकारी श्री. पी. पी. कुलकर्णी)

हिंदू विवाह याचिका क्र. १५५०/२०२३ निशाणी क्र. ३३

निलेश लक्ष्मण ठाणकर,
वय– ३९ वर्षे, व्यवसाय– नोकरी,
रा. ठाणकर निवास, आग्रा रोड,
साई दर्शन सोसायटी जवळ,
ठाणकर पाडा, कल्याण (प.) – अर्जदार क्र. १

आणि

नेहा निलेश ठाणकर
लग्नापूर्वीचे नाव– नेहा जगन्नाथ भोईर
वय– वर्षे, व्यवसाय– नोकरी,
रा. महादेव निवास, सुभाष रोड,
हनुमान मंदिरा जवळ, चिंचोडयाचा पाडा,
डोंबिवली (प.), जि. ठाणे. ४२१३०२ –अर्जदार क्र. २

हिंदू विवाह कायद्याच्या कलम १३ (ब) प्रमाणे आपसी संमतीने विवाह विच्छेदाचा अर्ज
अर्जदार क्र. १ करिता वकील– सुरेश ठकोरे
अर्जदार क्र. २ करिता वकील– ए. एफ. काझी

न्यायनिर्णय

(तारीख ०६ ऑगस्ट २०२६)

१)     प्रस्तुत अर्ज अर्जदार पतीपत्नीने हिंदू विवाह कायदा कलम १३ ब नुसार आपसी संमतीने विवाह संबंध विच्छेद होऊन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. अर्जातील कथन थोडक्यात याप्रमाणे– अर्जदार क्र. २  ही अर्जदार क्र. १ ची पत्नी आहे. अर्जदार क्र. १ याने सुरूवातीस हिंदू विवाह कायदा कलम १३(१)(आय–ए) नुसार याचिका दाखल केली होती. याचिका प्रलंबित असताना नि. २० वर याचिकेमध्ये दुरूस्ती करणेकरिता अर्ज दाखल केला होता व तो अर्ज मंजूर झालेवर सदरची याचिका कलम १३ब मध्ये रूपांतरीत झालेली आहे.

अर्जातील म्हणण्याप्रमाणे, अर्जदारांचा विवाह दि. १५.०३.२०२१ रोजी डोंबिवली (प.) येथे हिंदू धर्माच्या रीतिरिवाजाप्रमाणे झाला असून विवाहसंबंध कायम आहेत. अर्जदार क्र. १ व २ यांना सदर लग्नसंबंधापासून एक मुलगा आहे. विवाहानंतर अर्जदारांमध्ये आवडीनिवडी व विचार भिन्न असल्यामुळे कधीच पटले नाही. त्यामुळे अर्जदार क्र. १ व २ हे दि. २२.०४.२०२२ पासून एकमेकांपासून वेगळे राहत आहेत. भविष्यामध्ये दोघांचे सोबत राहणे शक्य नसल्यामुळे त्यांनी आपसांत संमतीने विवाह विच्छेद करण्याचा निर्णय घेतला व हा अर्ज दाखल केला. अर्जात कथन केल्याप्रमाणे दोन्ही पक्षांमध्ये तडजोड झाली आहे.

२)     अर्जदार पतीपत्नीमधील मतभेद संपुष्टात येऊन ते पुन्हा संसाराला लागण्याच्या उद्देशाने केलेल्या मध्यस्थीत त्यांच्यात समेट झाला नाही. अर्जदार क्र. १ व २ यांनी पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. २८ व २९ प्रमाणे दाखल केले. लग्नपत्रिकेला नि.क्र. ३० देण्यात आले. लग्नाच्या फोटोला नि.क्र. ३१ देण्यात आली. अर्जातील कथनावरुन व पुराव्याच्या शपथपत्रावरुन खालील प्रश्न उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष खाली दिलेल्या कारणांसहित स्पष्ट दिले.

| क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दोन्ही अर्जदार हे एक वर्षापेक्षा अधिक काळापासून विभक्त असून त्यांनी संमतीने विवाह विच्छेद करण्याचे ठरविले आहे काय? | होय. |
| २. | दोन्ही अर्जदार हे विवाह विच्छेदाचा हुकूमनामा मिळण्यास पात्र आहेत काय? | होय.<br>अर्ज मंजूर. |

कारणमीमांसा

३)     मुद्दा क्र. १ व २ करिता– अर्जदारांनी पुरावा व शपथपत्रातील कथन मान्य केले. अर्जात व पुराव्याचे शपथपत्रात कथन केल्याप्रमाणे दोन्ही अर्जदारांमध्ये तडजोड झाली आहे. दोन्ही अर्जदार जवळपास तीन वर्षापेक्षा अधिक काळापासून एकमेकांपासून वेगळे राहत आहेत. दोघे आता एकत्र राहू शकत नाहीत, असे त्यांनी न्यायालयासमक्ष कबूल केले. त्यांच्यातील न्यायालयामार्फत घेण्यात आलेली

मध्यस्थी असफल झाली. दोन्ही अर्जदारांनी स्वेच्छेने व कोणाच्याही दडपणाखाली न येता संमतीने विवाह विच्छेद करण्याची विनंती केली. अर्जास कारण या न्यायालयाच्या न्यायाधिकारितेत घडले आहे. अर्जदारांनी हिंदू विवाह कायद्याच्या कलम १३ (ब) प्रमाणे पूर्तता केली आहे. त्यामुळे या न्यायालयास दोन्ही अर्जदारांनी संमतीने घटस्फोट नाकारण्याकरिता कोणतेही कायदेशीर कारण नाही. सबब मी प्रश्न क्र. १ व २ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविले आहेत व खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ निलेश लक्ष्मण ठाणकर व अर्जदार क्र.२ नेहा निलेश ठाणकर लग्नापूर्वीचे नाव– नेहा जगन्नाथ भोईर हयांच्या दिनांक १५.०३.२०२१ रोजी झालेल्या विवाहाचे या आदेशाच्या दिनांकापासून विच्छेदन झाले आहे असे जाहीर करण्यात येत आहे.

३. दाव्यातील तडजोड व आदेशाप्रमाणे हुकूमनामा करण्यात येतो.

४. हिंदू विवाह कायदा कलम २३(४) प्रमाणे निकालाची प्रत्येकी एक प्रत अर्जदारांना विनामूल्य देण्यात यावी.

Digitally signed by PRASHANT PRABHAKAR KULKARNI
Date: 2026.08.07 11:14:54 +0530

(पी. पी. कुलकर्णी)

सहदिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
कल्याण.

कल्याण

दिनांक : ०६/०८/२०२६